प्रकरण तिसरे

सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण

प्रकरण ३ रे

सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण

(Dairy Co-operatives And Empowerment of Rural Women)

प्रास्ताविक :-

यापूर्वी दुसऱ्या प्रकरणात महिला सबलीकरणाची संकल्पना, साहित्याचे परिशिलन आणि प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली संशोधन पध्दती स्पष्ट केली आहे.

या प्रकरणात , नमुना म्हणून निवडलेल्या ४५ महिला उत्तरदात्यांकडून मुलाखत , अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सहकारी दूध संस्था स्त्रियांच्या सबलीकरणाच्या विकासात कोणती भूमिका पार पाडीत आहेत हे समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सदर प्रकरणात तीन स्थूल विभाग करण्यात आले आहेत.

पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीविषयीचे विवेचन आहे. दुसऱ्या विभागात उत्तरदात्यांच्या दूग्ध व्यवसायातील सहभागाबदलचे विवेचन आहे. तर तिसऱ्या विभागात सहकारी दूध संस्थातील सहभाग आणि त्यामुळे उत्तरदात्यांवर पडलेला प्रभाव या संबधिच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रारंभी आपण अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीचा परिचय करून घेऊ.

३.१ उत्तर दात्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी (**Respondents' Socio-Economic Background**)

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने उत्तरदात्यांचे वय, शिक्षण, वैवाहिक दर्जा, कुटुंबाचा प्रकार, कुटुंबाचा आकार, जात, उत्तरदात्यांच्या पतीचे शिक्षण त्यांच्या पतीचा

व्यवसाय, कौटूंबिक मालकीची जमीन, कुटूंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न, कुटूंबाच्या मालकीची दुभती जनावरे, दैनंदिन दूध पुरवठा, प्रतिलिटर मिळणारा दुधाचा दर, दुधापासून मिळणारे मासीक उत्पन्न इत्यादी परिवर्त्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन खाली दिले आहे.

३.१.१ वय (Age)

सारणी कमांक ३.१.१ मध्ये उत्तरदात्यांचे वयोगटानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.१

उत्तरदात्यांचे वयोगटानुसार वर्गीकरण

अ.नं.	वयोगट	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	१५ ते २५ वर्षापर्यंत	०७	१५.५५ %
२	२६ ते ३५ वर्षापर्यंत	१५	३३.३३ %
३	३६ ते ५० वर्षापर्यंत	१७	३७.७७ %
४	५१ ते ६० वर्षापर्यंत	०६	१३.३३ %
	एकूण	४५	१०० %

वरील सारणीवरून स्पष्ट पणे दिसून येते की सहकारी दूध संस्थाचे सभासद असणाऱ्या महिलांमध्ये ३६ ते ५० वयोगटातील महिलांचे प्रमाण सर्वात अधिक (३७.७७ %) आहे. ५१ ते ६० वर्षे या वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी (१३.३३%) आहे. यानंतर तरूण वयोगटातील स्त्रि यांचे प्रमाण। (१५.५५ %) इतके आहे.

तरूण आणि वृध्द स्त्रियांच्या तूलनेत परिपक्व आणि प्रौढ वयोगटातील (२६ ते ५०वर्षे) स्त्रियांना सहकारी दूध संस्थाचे सभासदत्व देण्याकडे कल आहे असे वरील सारणी वरून सूचित होते.

३.१.२ शैक्षणिक दर्जा (**Eduational Status**)

सारणी कमांक ३.१.२ मध्ये उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.२

उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण

अ.नं.	शैक्षणिक पात्रता	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	अशिक्षित	२०	४४.४५ %
२	अल्पशिक्षित (प्रौढ शिक्षण वर्गात झालेले शिक्षण)	०३	०.६६ %
३	प्राथमिक	१२	२६.६६ %
४	माध्यमिक	०७	१५.५५ %
५	उच्च माध्यमिक	०२	०४.४४ %
६	पदवी	०१	०२.२२ %
	एकूण	४५	१०० %

सारणी क्रमांक ३.१.२ वरून असे दिसून येते की उत्तदात्यांमध्ये अशिक्षित महिलांचे प्रमाण (४४.४५ %) सर्वात अधिक आहे. त्यानंतर अनुक्रमे प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षण झालेल्या महिला (२६.६६ %) माध्यमिक (१५.५५ %), उच्च माध्यमिक (४.४५ %) पदवी (२.३३ %) स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या स्त्रिया आहेत.

बहूसंख्य उत्तरदात्या महिला ३६ ते ५० वयोगटातील आहेत हे आपण पाहिलें आहे. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्यां महिलांमध्ये अशिक्षित महिलांचे प्रमाण अधिक असणे आश्चर्यकारक नाही. कारण सुमारे तीन दशकापूर्वी ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. सापेक्षतः तरूण वयोगटातील महिला उत्तरदात्यांमध्ये सुशिक्षित महिलांचे प्रमाण अधिक आहे असे त्यांच्या मुलाखतीच्या वेळीच निदर्शनास आले आहे.

३.१.३ वैवाहिक दर्जा (**Marital Status**)

सारणी क्रमांक ३.१.३ मध्ये उत्तरदात्यांचे वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी क्रमांक ३.१.३

उत्तरदात्यांचे वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण

अ.नं.	वैवाहिक दर्जा	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	विवाहित	४३	९५.५६ %
२	विधवा	०२	०४.४४ %
	एकूण	४५	१०० %

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या ४५ स्त्रियांपैकी (९५.५६ %) स्त्रिया विवाहित तर उर्वरित २ (४.४४ %) स्त्रिया या विधवा होत्या.

निवडलेल्या नमुन्यात सहकारी दूध संस्थेची सभासद असणारी एकही अविवाहित महिला नव्हती ही उल्लेखनीय बाब आहे. 'अविवाहित मूलगी' परक्याचे धन' अशी ग्रामीण भागातील लोंकांची धारणा आहे. त्यामुळे तिच्या नावावर संस्थेचे समभाग शेअर्स कोणीही विकत घेत नाही. कायम स्वरूपी राहिल अशी कौटूंबिक संपत्ती अविवाहित स्त्रीच्या सामाजिक सहभागाला उत्तेजन देणे या बाबीकडे ग्रामीण समाजात अजुनही कल दिसून येत नाही हे यावरून सूचित होते.

३.१.४ कुटूंबाचा प्रकार (Family Type)

सारणी कमांक ३.१.४ मध्ये उत्तरदात्यांचे कुंटूंबाच्या प्रकारावरून वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.४

उत्तरदात्यांचे कुटूंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण

अ.नं.	कुटूंबाचा प्रकार	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	संयुक्त कुटूंब	१०	२२.२३ %
२	विभक्त कुटूंब	३५	७७.७७ %
	एकूण	४५	१००

सारणी क्रमांक ४ मधील माहितीवरून हे स्पष्ट होते की, बहूसंख्य (७७.७७ %) उत्तरदाते हे विभक्त कुटूंबातील आहेत तर उर्वरित (२२.२३ %) उत्तरदाते हे संयुक्त कुटूंबातील आहेत

कौटूंबिक पार्श्वभूमीच्या बाबतीत उत्तरदात्यांमध्ये लक्षणिय फरक दिसून येतो. ग्रामीण भागातही आता विभक्त कुटूंबाचे प्रमाण वाढत आहे असा कल दिसून येतो. याची अनेक कारणे आहेत, शिक्षण, दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता, व्यक्तिगततेचा विकास, शहरांचा प्रभाव आदि कारणांमूळे ग्रामीण भागात आता संयूक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटूंब पध्दत रूढ होत चालली आहे.

बहुसंख्य उत्तरदाते विभक्त कुटूबांतील स्त्री सदस्य आहेत यावरून विभक्त कुटूंब पध्दती स्त्रियांच्या उन्नती करीता अधिक पोषक ठरत असल्याचे सूचित होते. विभक्त कुटूंबाचे सदस्य असणाऱ्या स्त्रियांना सहकारी संस्थाचे सभासद होण्यास व त्यात सहभागी होण्यास त्यांच्या पुरूष साथीदारांकडून स्वातंत्र्य मिळत असल्याचेही प्रस्तुत आकडेवारी वरून सूचित होते.

३.१.५ कुटूंबाचा आकार (Family Size)

सारणी क्रमांक ३.१.५ मध्ये उत्तरदात्यांचे कुटूंबाच्या आकारमानानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

ग्रामीण भागातील कुटूंबाच्या संरचनेत बदल घडून येत आहे. म्हणजेच एकत्र कुटूंब पध्दती मोडकळीस येऊन विभक्त कुटूंब पध्दती ग्रामीण भागात रूढ होऊ पहात आहे. असा कल प्रस्तूत अभ्यासात दिसून आला आहे.

सारणी क्रमांक ३.१.५ मध्ये उत्तरदात्यांच्या कुटूंबातील संदस्यांच्या संख्येवरून वर्गीकरण केले आहे. सदर वर्गीकरण करताना ५ पर्यंत सदस्य संख्या असणाऱ्या कुटूंबाला

'लहान कुटूंब', ६ते १० सदस्य असणाऱ्या कुटूंबाला मध्यम कुटूंब व ११ हून अधिक सदस्य संख्या असणाऱ्या कुटूंबाला 'मोठे कुटूंब' असे समजण्यात आले आहे.

सारणी कमांक ३.१.५

उत्तरदात्यांचे कुटूंबाच्या आकारमानानुसार वर्गीकरण

अ.नं.	कुटूंबाचा आकार	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	५ पर्यत	२६	५७.७८ %
२	६ ते १० पर्यंत	१२	२६.६७ %
३	११ हून अधिक	०७	१५.४५ %
	एकूण	४५	१०० %

सारणी कमांक ३.१.५ मधील माहिती वरून स्पष्टपणे दिसून येते की सर्वाधिक(५७.७८ %) उत्तरदाते लहान आकाराच्या कुटूंबातील तर त्या खालोखाल अनुक्रमे मध्यम आकाराच्या कुंटूंबातील (२६.६७ %) आणि मोठया आकाराच्या कुटूबांतील (१५.४५ %) आहेत.

उत्तरदात्यांमध्ये विभक्त कुटूंबाची पार्श्वभूमी लाभलेले उत्तरदाते अधिक प्रमाणात असल्याने लहान आकाराच्या कुटूंबाची पार्श्वभूमी उत्तरदात्यांना असणे ही बाब फारशी आश्चर्यकारक नाही तरीदेखील एक लक्षणीय बाब म्हणजे ग्रामीण कुटूंबाचा आकार मर्यादित होत चालल्याचा सर्वसाधारण निष्कर्ष वरील माहितीवरून काढता येईल.

३.१.६ जातीनुसार वर्गीकरण (Caste)

सारणी क्रमांक ३.१.६ मध्ये उत्तरदात्यांचे जातीनुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी क्रमांक ३.१.६

उत्तरदात्यांचे जातीनुसार वर्गीकरण

अ.नं.	जातीनुसार वर्गीकरण	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	मराठा	४३	९३.४४ %
२	महार	०१	०२.२२ %
३	बेरड	०१	०२.२२ %
४	परीट	०१	०२.२२ %
	एकूण	४५	१०० %

सारणी क्रमांक ३.१.६ मधील माहितीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये मराठा जातीच्या स्त्रि यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे (९३.३४%) आहे. त्यानंतर अनुक्रमे महार (२.२२%), बेरड (२.२२%), परीट (२.२२%) असे उत्तरदात्यांचे प्रमाण आहे.

एकदंर महाराष्ट्रात तसेच चंदगड तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येत मराठा जातीच्या सदस्यांची संख्या सापेक्षता अधिक आहे. सहकारी दूध संस्थाच्या व इतर सहकारी क्षेत्राच्या उभारणीमधील सदस्यांमध्ये देखील मराठा जातीच्या सदस्यांचे प्राबल्य दिसून येते. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्यांमधील मराठा जातीच्या सदस्यांचेच प्रमाण अधिक असणे फारसे आश्चर्यकारक नाही. वरील सारणीतील माहितीवरून दिसूण येणारी ठळक बाब म्हणजे सहकारी दूध संस्थेत जरी मराठा

समाजातील महिला सभासदांचे प्राबल्य असले तरी विषम प्रमाणात असणाऱ्या इतर जातीच्या स्त्रियांनाही दूध संस्थाचे सभासद करून घेतले आहे.

यावरून असे दिसून येते की, सहकारी दूध संस्था जाती–जातीतील बंधने झुगारून देणाऱ्या संस्था आहेत. सहकारी दूध संस्थेच्या माध्यमातून विविध जातीच्या स्त्रियांना गावपातळीवर एकत्र काम करण्याची व परस्परांशी प्रभावी आंतरक्रिया करण्याची संधी मिळत असल्याने पारंपारिक जातीय पूर्वग्रह कमी होऊन जाती–जातीमधील उच्चनीचता कमी होऊन आपआपसात सलोख्याचे , सौहार्दाचे वातावरण निर्माण होण्यास चालना मिळत आहे.

३.१.७ उत्तरदात्यांच्या पतीचे शिक्षण(**Respondents' Husband's Education**)

सारणी कमांक ३.१.७ मध्ये उत्तरदात्यां स्त्री सभासदांच्या पतीच्या शिक्षणासंबधित माहितीचे वर्गीकरण स्पष्ट दिले आहे.

सारणी कमांक ३.१.७

उत्तरदात्या स्त्री सभासदांच्या पतीच्या शिक्षणासंबधित माहितीचे वर्गीकरण

अ.नं.	स्त्री सभासदांच्या पतीचे शिक्षण	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	अशिक्षित	११	२४.४५%
२	अल्पशिक्षित (प्रौढ शिक्षण वर्गात झालेले शिक्षण)	०३	०६.६६%
३	प्राथमिक	१३	२८.८८%
४	माध्यमिक	०७	१५.५५%
५	उच्च माध्यमिक	०४	०८.८८%
६	पदवी	०१	०२.२२%
६	पदव्युत्तर	०६	१३.३३%
	एकूण	४५	१०० %

सारणी कमांक ३.१.७ वरून असे दिसून येते की जवळ जवळ ३/४ उत्तरदात्यांचे पती साक्षर आहेत तर उर्वरित ११(२४.४४%) निरक्षर आहेत. बहुतांशी उत्तरदात्या महिलांचे पती (२८.८८%) प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत. माध्यमिक , उच्च माध्यमिक, पदवी आणि पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्यांची संख्या अनुक्रमे (१५.५५%), (८.८८%), (२. २२%) व (१३.३३%) इतकी आहे.

यावरून असे दिसून येते की पती शिकलेले असतील तर स्त्रियांना कुटूंबाबाहेरील सहकारासारख्या क्षेत्रात सहभागी होण्याची संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता असते हे यावरून सूचित होते.

३.१.८ पतीचा व्यवसाय (Respondents' Husbands' Occupation) :-

सारणी कमांक ३.१.८ मध्ये उत्तरदात्यांच्या पतीच्या व्यवसायाबद्दलची महितीचे वर्गीकरण स्पष्ट दिले आहे.

सारणी कमांक ३.१.८

उत्तरदात्यांच्या पतीच्या व्यवसांयाबद्दलच्या माहितीचे वर्गीकरण

अ.नं.	उत्तरदात्यांच्या पतीचा व्यवसाय	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	शेती	३०	६६.६७%
२	नोकरी	१२	२६.६७%
३	लघूउद्योग (स्वयंरोजगार)	०१	०२.२२
	एकूण	४३	९५.६०

+ 2 ?

सारणी क्रमांक ३.१.८ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूतांशी (६६.६७%) उत्तरदात्या महिलांच्या पतीचा व्यवसाय हा शेती व्यवसायच आहे. त्या खालोखाल (२६.६७%) उत्तरदात्यांचे पती नोकरी करणारे आहेत. तर स्वतःचा लघूउद्योग असणाऱ्या पतीचे प्रमाण (२.२२%) आहे.

वरील माहितीच्या आधारे असे म्हणता येईल की ग्रामीण भागात शेती व्यवसायाला पूरक म्हणूनच दूध व्यवसायाला महत्व आहे. स्वतःच्या मालकीची शेतजमीन असेल तर दूमत्या जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था होते. त्यामूळेच शेतकरी कुटूंबात अर्थाजनाचे साधन म्हणून दूग्ध व्यवसायाला महत्व दिले जाते. या पार्श्वभूमीवर किती कुटूंबाकडे स्वतःच्या मालकिची जमीन आहे हे जाणून घेणे महत्वाचे ठरते.

३.१.९ कौटूंबिक मालकीची जमीन (Respondent s' Own Land)

सारणी कमांक ३.१.९ मध्ये जमीन मालकी क्षेत्रानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.९

जमीन मालकी क्षेत्रानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण

अ.नं.	स्वतःच्या कौटूंबिक मालकीची जमीन	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	सीमांत शेतकरी २.५ एकर पर्यंत	२०	४४.४५%
२	लहान शेतकरी २.५ ते ५.० एकर पर्यंत	१०	२२.२३%
३	मध्यम शेतकरी ५ ते ८ एकर	०४	०८.८८%
४	मोठे शेतकरी ८ एकरहून अधिक	०४	०८.८८%
५	भूमीहिन शे तकरी	०७	१५.५५%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.१.९ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य (४४.४५%) उत्तरदात्या महिलांचे कुटूंब सीमांत शेतकरी गटातील आहेत.यानंतर लहान शेतकरी गटातील महिला उत्तरदात्यांचे प्रमाण (२२.२३%) आहे. त्यानंतर मध्यम व मोठया शेतकरी

गटातील उत्तरदात्या महिलांचे प्रमाण अनुक्रमे (८.८८%) आढळून आले. तर भूमीहिन उत्तरदात्यांचे प्रमाण (१५.५५%) आहे.

वरील सारणीतील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य उत्तरदाते सीमांत शेतकरी गटात मोडतात. त्यानंतर मध्यम शेतकरी गटात मोडणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ही १/४ आहेत तर स्वतःच्या मालकीची जमीन नसणारे (१५.५५%) आहेत त्यांना शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नाही. शेत जमीन असणाऱ्यांनी दूध व्यवसाय दुय्यम व्यवसाय म्हणून स्वीकारला आहे. पण शेतमजूरी करणाऱ्या कुटूंबानीही या व्यवसायाचा आधार घेतला आहे, हे यावरून स्पष्ट होते.

३.१.१० कुटूबांचे सर्व मार्गांनी मिळून सरासरी वार्षिक उत्पन्न (**Respondents families Annual Income** from all sources)

सारणी कमांक ३.१.१० मध्ये उत्तरदात्यांचे सर्व मार्गांनी मिळून सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.१०

उत्तरदात्यांचे सर्व मार्गांनी मिळून सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

अ.नं.	कुटूंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	२०,००० पर्यंत	२०	४४.४६%
२	२०,००१ ते ५०,००० पर्यंत	१२	२६.४५%
३	५०,००१ ते १,००,००० पर्यंत	०७	१५.५५%
४	१,००,००० हून अधिक	०६	१३.४५%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.१.१० मधील माहितीवरून असे दिसून येते की बहुसंख्य २० (४४.४५%) उत्तरदाते रू २०,००० रूपयापर्यंतच्या वार्षिक उत्पन्न गटातील आहेत. त्या खालोखाल रू २०,००१ ते ५०,००० रू पर्यंत सरासरी वार्षिक उत्पन्न असणारे १२ (२६.

४५%) उत्तरदाते आहेत. तर ५०,००१ ते १,००,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे उत्तरदाते ७ (१५.५५%) तर १,००,००१ रू हून अधिक उत्पन्न असणारे उत्तरदाते ६ (१३. ३४%) आहेत.

वरील वर्गीकरण उत्तरदात्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे मांडले आहे. वरील माहितीवरून असे दिसून येते की जवळ जवळ ७०% उत्तरदात्यांचे निम्मे सरासरी वार्षिक उत्पन्न रू ५०,००० पर्यंत आहे. दुग्ध व्यवसायामुळे या कुटूंबांना आपले कौटूंबिक उत्पन्न वाढविण्यास मदत होत असली पाहिजे, असे अनुमान काढता येईल.

३.१.११ कौटूंबिक मालकीची दूमती जनावरे. (**Milch Animals** owned by Family)

उत्तर दात्यांकडे कौंटूबिक मालकीची दुमती जनावरे किती आहेत? हे जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली. खालील सारणीत सदर माहितीचे वर्गीकरण दिले आहे.

सारणी क्रमांक ३.१.११ मध्ये कौंटूबिक मालकीच्या दुमत्या जनावरांच्या संख्येनुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी क्रमांक ३.१.११

उत्तरदात्यांचे कौटूंबिक मालकीच्या दूमत्या जनावरांच्या संख्येनुसार वर्गीकरण

अ.नं.	दुमत्या जनावरांची संख्या	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	२ पर्यंत	३२	७१.१२%
२	३ ते ५ पर्यंत	०९	२०.७०%
३	सध्या दुमती जनावरे नसणारे	०४	०८.८८%
	एकूण	४५	१००%

सारणी क्रमांक ३.१.११ वरून असे दिसून येते की २ पर्यंत दुभती जनावरे असणारे ३२ (७१.१२%) महिला उत्तरदात्या आहेत त्यानंतर अनुक्रमे ३ ते ५ पर्यंत दुभती जनावरे असणारे उत्तरदात्यांचे प्रमाण ९ किंवा (२०%) आहे. तर सध्या दुभती जनावरे नसणारे उत्तरदात्यांचे प्रमाण ८.८८ % इतके आहे.

वरील सारणीवरून असे दिसून येते की २ पर्यंत दुभत्या जनावरांची संख्या असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे. याचे कारण म्हणजे त्यांच्यासाठी लागणाऱ्या चारा व त्यांची निगा राखणे या सारखी कामे सुसुत्रतेने व्हावा या दृष्टीने मर्यादित संख्या ठेवण्याकडे उत्तरदात्यांचा कल दिसून येतो.

३.१.१२ सहकारी दूध संस्थेत उत्तरदात्यांकडून दैनंदिन दूध पुरवठा (Daily Milk Supply)

उत्तरदाते दैनंदिन किती दूध दुधसंस्थेत जमा करतात याचा तपशील खालील सारणीत दिला आहे.

सारणी क्रमांक ३.१.१२ मध्ये उत्तरदात्यांनी दुधसंस्थेत दैनंदिन किती दूध पुरवठा केला आहे यांचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.१.१२

उत्तरदात्यांनी दुध संस्थेत दैनंदिन पुरवठा केलेल्या दुधाचे वर्गीकरण

अ.नं.	दैनंदिन दूध पुरवठा	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	२ लिटर पर्यत	०२	०४.४४
२	३ ते ५ लिटर पर्यत	११	२४.४५
३	६ ते ९ लिटर पर्यत	२०	४४.४५
४	१० हून अधिक	०८	१७.१७
५	सध्या दूध न पुरवणारे	०४	०८.८९
	एकूण	४५	१००

वरील सारणीवरून दिसून येते की दररोज ६ ते ९ लिटर्स पर्यत दूध जमा करणा-या स्त्री सभासदांचे प्रमाण उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक (२०) ४४.४५% आहे. त्या खालोखाल अनुकमे ३ ते ५ लिटर्स पर्यत दूध जमा करणाऱ्यांचे प्रमाण २४.४५% आणि १० हून अधिक लिटर दूध जमा करणाऱ्यांचे प्रमाणे १७.१७%आहे असे दिसून येते २ लिटरपर्यत दूध जमा करणारे दोनच उत्तरदाते आहेत व उर्वरित चार उत्तरदाते दूध पुरवठा न करणारे आहेत.

वरील सारणीवरून असे सूचित होते की, बहुतांशी उत्तरदात्यांच्या कुटूबांनी उत्पन्नाचा एक दुय्यम स्त्रोत, जोड व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय स्विकारला आहे.

३.१.१३ प्रती लिटर दूधाला मिळाणारा दर (Price Paid For One Litere)

सारणी कमांक ३.१.१३ मध्ये उत्तरदात्यांना दूधासाठी मिळणाऱ्या प्रतिलिटर दरानूसार वर्गीकरण केले आहे.

सारणी कमांक ३.१.१३

उत्तरदात्यांना दूधासाठी मिळणाऱ्या प्रतिलिटर दुधाच्या दराचे वर्गीकरण

अ.नं.	प्रति लिटर मिळाणारा दूधाचा दर	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	रू ८ ते १०	०५	११.१२
२	रू ११ ते १५	१६	३५.५६
३	रू १४ ते १६	२०	४४.४४
४	सध्या दूध न पुरवणारे	०४	०६.६६
	एकूण	४५	१००

सारणी कमांक ३.१.१३ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य उत्तरदात्यांना (४४.४४%) रू १४ ते १६ रू दरम्यान प्रति लिटर दूधाला दर मिळतो. त्याखालोखाल १६ उत्तरदात्यांना रू ११ ते १३ रू प्रतिलिटर दूध दर मिळतो तर ५ उत्तरदात्यांना रू ८ ते १० प्रमाणे दूधाचा दर मिळतो.

वरील सारणीवरून असे दिसून येते की दूधाचा दर हा त्या दुधातील स्निग्धांशा प्रमाणे ठरत असल्याने उत्तरदात्यांना मिळणाऱ्या दुध दरात भिन्नता आहे.

३.१.१४ दूधापासून मिळणारे मासिक उत्पन्न (Monthly Income From Milk)

सारणी क्रमांक ३.१.१४ मध्ये उत्तरदात्यांचे दूधापासून मिळाणारे मासिक उत्पन्नाचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी क्रमांक ३.१.१४

उत्तरदात्यांचे दूधापासून मिळणारे मासिक उत्पन्नाचे वर्गीकरण

अ.नं.	दुधापासून मिळणारे मासिक उत्पन्न	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	रूपये १००० पर्यत	०५	११.१२%
२	रूपये १००१ ते २००० पर्यत	१६	३५.५६%
३	रूपये २००१ ते ४००० पर्यत	१६	३५.५६%
४	रूपये ४००१ ते ६००० पर्यत	०३	०६.६६%
५	रूपये ६००१ अधिक	०१	०२.२२%
६	सध्या दूध न पुरवणारे	०४	०.८८%
	एकूण	४५	१००

वरील सारणीवरून असे दिसून येते की सहकारी संस्थेला दूध पूरवणाऱ्या सर्वच सभासदांना दरमहा १००० रूपये उत्पन्न मिळते. वरील सारणीवरून असे दिसून येते की बहुतांशी (७१.१२%) उत्तरदात्यांना ३२ किंवा . १००० ते ४००० रूपये पर्यत दूधापासून दरमहा उत्पन्न मिळते. ४००१ ते ६००० रूपयेपर्यंत दूधापासूनचे दरमहा उत्पन्न असणारे ३ उत्तरदाते तर ६००० रूपयांपर्यंत अधिक उत्पन्न असणारा एक उत्तरदाता आहे.

यावरून असे म्हणता येईल की रोखीने हमखास उत्पन्न देणारा एक दुय्यम व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय ग्रामीण भागातील लोंकांना त्यांचे जीवनमान उचावण्यास निश्चितच आर्थिक दृष्टया मदत करणारा आहे असे म्हणता येईल.

संचालक मंडळातील महिला सदस्यांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी काही निरीक्षणे

अभ्यासासाठी निवडलेल्या महिला सहकारी दूध संस्थांच्या संचालक मंडळातील सदस्यांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी अधिक स्पष्ट व्हावी म्हणून जात, वय, शिक्षण, कौटूबिक पार्श्वभूमी आणि कौटूबिक उत्पन्न या निवडक परिवर्त्यासंदर्भातील माहितीचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले असता खालील ठळक बाबी दिसून आल्या.

महिला सहकारी दूध संस्थेच्या संचालक मंडळातील सदस्यात मराठा जातीच्या स्त्रियांचे प्रमाण १७ अधिक दिसून येते. महार , बेरड, परीट जातीतील स्त्रीयांही संचालक मंडळात प्रतिनिधित्व करताना दिसून येतात. २५ ते ३५ या वयोगटातील स्त्रियांची संख्या १० आहे तर त्याखालोखाल ३६ ते ५० वयोगटातील ८ महिला संचालिका म्हणून काम पहातात. एक प्रौढ व एक २५ वर्षापेक्षा कमी वयाची महिलाही या संचालक मंडळात आहे. केवळ ५ अशिक्षित स्त्रिया वगळता सुशिक्षीत स्त्रियांचे प्रमाण संचालक मंडळात अधिक आहे. त्यामध्ये प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षण झालेल्या १२ महिला, माध्यमिक शिक्षण झालेल्या, २ व पदवीपर्यत शिक्षण घेतलेली एक महिला आहे. संचालक मंडळात विभक्त कुटूंबाची पार्श्वभूमी असणा-या १२ महिला प्रतिनिधी आहेत तर त्या खालोखाल ८ महिला संयूक्त कुटूंबाची पार्श्वभूमी असणा-या आहेत. कौटूबिक वार्षिक उत्पन्न २० ते ५० हजार रूपयापर्यंत असणा-या ८ महिला आहेत तर २० हजार रूपयेपर्यत कौटूंबिक वाषिक उत्पन्न असणा-या ७ महिला व १ लाख रूपयेपर्यत वार्षिक उत्पन्न असणा-या ५ महिला आहेत.

यावरून असे दिसून येते की संचालक मंडळात प्रतिनिधित्व करणा-या महिला या मराठा जातीतील जास्त प्रमाणात आहेत. तर बहूतांशी स्त्रिया सुशिक्षीत मध्यमवयीन व विभक्त कुटूंबातील व मध्यम उत्पन्न गटातील आहेत.

संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक क्वचितच घेतली जाते. अन्यथा सर्वानुमते विचार विनिमय होऊन संचालक मंडळ सर्व संमतीने निवडले जाते. प्रत्यक्ष निरिक्षणावरून असे दिसून आले की, दूध संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणा-या पुरूष व्यक्तीच्या कुटूंबातील किंवा नात्यातील महिलांची सदर संस्थेच्या संचालक पदी निवड केली जाते

विभाग २ रा :उत्तरदात्यांचा दुग्ध व्यवसाय आणि सहकारी संस्थेतील सहभाग (Respondents' Milk occupation and particiption in dairy co-operative)

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने उत्तरदात्यांचे दुग्ध व्यवसायातील सहभाग, दुभत्या जनावरांची देखभाल, धार काढणे, दूध संस्थेत दूध जमा करणे, दूध बिलाचे पैसे स्वीकारणे, दूध बिलाचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार, दूध बिलाच्या रक्कमेपैकी स्वतःसाठी काही रक्कम खर्च करणे, दुधापासूनमिळण्या-या उत्पन्नातून कुटूंबाच्या कोणत्या गरजा भागतात? उत्तरदात्यांच्या नांवे बँकेत अथवा पतसंस्थेत दूधबिलापैकी काही रक्कम गुंतविली आहे काय,? मतदानाचा निर्णय महिलांचा सभोतील सहभाग, सभेमध्ये मत मांडणे दूध संस्थेतील महिला उत्तरदात्यांचा सहभाग इत्यादी परिवर्त्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांचा दूधसंस्थेतील व दूग्ध व्यवसायातील सहभागाचे वर्णन पुढील प्रमाणे दिले आहे.

३.२.१ दूभत्या जनावरांची देखभाल कोण करते ?(Who Looks after Milch animals) .

दुभत्या जनावरांची देखभाल आपण स्वतः करता काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारण्यात आला. सर्वच उत्तरदात्यांनी असे सागितले की दूभत्या

जनावरांची देखभाल आम्ही स्वतः करतो.. त्याचबरोबर प्रसंगी घरातील इतर व्यक्तीही हे काम करत असतात. असेही त्यांनी सांगितले दूभत्या जनावरांचा लागणारा चारा शेतातून आणण्याचे काम तसेच जनावरे चारावयास नेण्याचे कामही सामान्यपणे पुरूषव्यक्तीच करतात. आणलेला चारा जनावरांना वेळच्यावेळी घालणे , दुभती जनावरे स्वच्छ ठेवणे, गोठा स्वच्छ ठेवणे, शेण काढणे इत्यादी कामे साधारणतः स्त्रियाच करीत असतात. पुरूषाबरोबच स्त्रियांचेही शारिरीक श्रम या दुग्ध व्यवसायात मोठया प्रमाणावर आहे. असे प्रत्यक्ष निरिक्षणावरून दिसून आले.

३.२.२ धार काढण्याचे काम कोण करते. (**Who Milksthe milch animals**)

धार काढण्याचे काम आपण स्वतः करता काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला तेंव्हा त्यांनी सकाळ, संध्याकाळ, स्वयंपाक पाणी व धार काढण्याच्या वेळा साधारणतः एकाच वेळी असल्याकारणाने धार काढण्याचे काम आपण स्वतःकरीत नाही असे जवळ जवळ ३/४ महिला उत्तरदात्यांनी सांगितले. उर्वरित महिला उत्तरदात्यांनी धार काढण्याचे काम आपण स्वतः करतो असे सांगितले म्हणजे धार काढण्याच्या कामातही कांही महिलांचा सहभाग असतो.

३.२.३ दूध संस्थेत दूध कोण नेऊन जमा करते ? (**Who carries Milk in M.P.S.S.**)

संस्थेत दूध जमा करण्याचे काम कोण करते ? या विषयीचा तपशील खालील सारणीत दिलेला आहे.

सारणी कमांक ३.२.३

दूध संस्थेत दूध कोण नेऊन जमा करते ?

अ.नं.	दूध संस्थेत दूध कोण नेऊन जमा करते ?	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	स्वतः	०२	०४.४५%
२	पती किंवा घरातील अन्य व्यक्ती	३९	८६.६७%
३	सध्या दूध न पूरवणारे	०४	०८.८९%
	एकूण	४५	१००%

३.२.३ सारणी वरून सहकारी दूध संस्थेत दूध जमा करण्याचे काम मुख्यतः पती किंवा घरातील अन्य व्यक्तीच (८६.६७%) करतात असे वरील सारणीवरून दिसून येते. संस्थेत दूध जमा करण्याच्या वेळा सकाळी आणि सायंकाळी ठरलेल्या असतात नेमक्या याच कालावधीत स्त्रियांना स्वयंपाकाचे काम असते यामुळे प्रत्यक्षात संस्थेत दूध जमा करणे स्त्रियांना शक्य नसते त्यांतूनही (४.४४%) महिला संस्थेत दूध जमा करण्याचे काम स्वतः करतात असे त्यांच्या प्रतिक्रियेवरून दिसून आले.

दूध व्यवसायात स्त्रियांचे शारीरिक श्रम मोठया प्रमाणावर गुंतलेले आहेत सहकारी दुध संस्थामुळे स्त्रियांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे समाजातील आर्थिक उत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढीस लागला आहे. अशाप्रकारे स्त्रियांच्या सामाजिक आणि अर्थिक सबलीकरणास सहकारी दूध संस्थेमूळे चालना मिळाली आहे असे म्हणता येईल.

३.२.४ दुधबिलाचे पैसे कोण स्वीकारते ? (**Who receives the Milk Bill**).

सारणी क्रमांक ३.२.४ मध्ये उत्तरदात्यांना विचारलेल्या दूध बिलाचे पैसे कोण स्विकारते ? या बदद्लच्या माहितीचे वर्गीकरण दिले आहे.

सारणी क्रमांक ३.२.४

दूध बिलाचे पैसे कोण स्विकारते ?

अ.नं.	दूध बिलाचे पैसे कोण स्विकारते ?	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	स्वत:	०२	०४.४५%
२	पती	२३	५१.१२%
३	कुटूंबातील इतर अन्य सदस्य	१६	३५.५५%
४	सध्या दूध न पूरवणारे	०४	०८.८८%
	एकूण	४५	१००

सारणी क्रमांक ३.२.४ मधील माहितीवरून असे दिसून येते की, निवडलेल्या महिला उत्तरदात्यांच्या कुटूंबातील अन्य व्यक्तींचे दूधापासूनचे मिळाणारे बिल स्वीकारण्याचे एकूण प्रमाण जादा आहे. त्यामध्ये उत्तरदात्या महिलांच्या पतीचे पैसे स्वीकारण्याचे प्रमाण (५१.१२%) त्याखालोखाल (३५.५५%) त्यांच्या कुटूंबातील अन्य सदस्य दूध बिलाचे पैसे स्विकारतात तर केवळ (४.४५%) महिलाउत्तरदात्या स्वतः दूध बिलाचे पैसे स्विकारतात.

पण तथ्यसंकलानाच्या वेळी असे दिसून आले की जरी दूध बिलाची रक्कम आणण्यासाठी उत्तरदात्या सभासद महिलांचे पती प्रत्यक्षात जात असले तरी काही केंद्र कुटूंबात दूधबिलाचे पैसे स्त्रियांच्या हाती आणून दिले जातत. असे काही

उत्तरदात्यांकडून सांगण्यात आले. तर ज्या संयूक्त कुटूंबात वडिलधा–या व्यक्तींकडे सर्व आर्थिक व्यवहार आहेत त्या कुंटूंबात मात्र दूधबिलाचे पैसे कुटूंबप्रमुखाच्याच हाती असतात असे प्रस्तुत संशोधिकेचे निरिक्षण आहे.

३.२.५ दूध बिलाचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार (Freedom & Right to Spend the Money from Milk Bill)

सारणी कमांक ३.२.५ मध्ये उत्तरदात्यांना दूध बिलाचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार आहे काय ? या संबधिच्या माहितीचे वर्गीकरण दिले आहे.

सारणीकमांक ३.२.५

उत्तरदात्यांना दूध बिलाचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार आहे काय ?

अ.नं.	उत्तरदात्यांचे प्रवर्ग	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	होय	२३	५१.१२%
२	नाही	२२	४८.८८%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.२.५ मधील माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांशी उत्तरदात्या महिलांना (५१.१२%) दूध बिलाचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार आहे. पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार असणा–या महिला उत्तरदात्या हया केंद्र कुटूंबातील आहेत असे संशोधिकेला आढळून आले. संयूक्त कुटूंबाची पार्श्वभूमी असणा–या महिला उत्तरदात्यांना दूधबिलांच्या पैशांचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य व अधिकार मिळत नाहीत हे मुलाखत अनुसूचिच्या दूधबिलाच्या पैशाचा वेळी मिळविलेल्या माहितीवरून दिसून येते.

३.२.६ दूध बिलाच्या रक्कमेपैकी काही रक्कम उत्तरदात्या स्वतःसाठी खर्च करतात काय? (Do you spend money for your self from this milk)

दूध बिलाचे पैसे महिला स्वतःसाठी खर्च करतात का या संबधीची माहिती संकलित केली. सदर माहिती सारणी कमांक ३.२.६ मध्ये वर्गीकृत केली आहे.

सारणी कमांक ३.२.६

दूध बिलाच्या रक्कमेपैकी काही रक्कम महिला सभासद स्वतःसाठी खर्च करतात काय?

अ.नं.	दूध बिलाचे पैसे स्वतःसाठी खर्च करतात का ?	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	होय	२०	४४.४४%
२	नाही	२५	५५.५६%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.२.६ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य महिला उत्तरदात्या २५ (५५.५५%) या दूधबिलाचा विनियोग स्वतःसाठी करत नाहीत.तर ज्या महिला उत्तरदात्या दूध बिलाचे पैसे स्वतः खर्च करतात त्यांची दूध बिलाच्या मिळणा–या रक्कमेतून स्वतःचे कपडे, औषधपाणी व स्वतःसाठी दागदागिने इत्यांदी खरेदी करतात असे सांगितले.एक गोष्ट येथे दिसून आली ती म्हणजे स्वतःसाठी दूधबिलाची रक्कम खर्च करणा–या बहूतांशी महिला या विभक्त कुटूंबातील होत्या असे प्रत्यक्ष निरिक्षणावरून निदर्शनाला आले.

३.२.७ दूध बिलाच्या उत्पन्नातून कुटूंबाच्या कोणत्या गरजा भागतात ? (What family needs are satsfied from this this Milk Bill)

या विषयाची माहिती संकलित करण्यात आली सदर माहितीच्या बहुतांश ३/४ महिला उत्तरदात्यांच्या कुंटूंबातील प्राथमिक गरजा जसे दैनंदिन घरखर्च व बाजारहाट या गोष्टी प्रामुख्याने दूध बिलाच्या मिळणा-या रक्कमेतून भागतात असे सदर महिला उत्तरदात्यांनी प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी सागितले तर १/४ महिला उत्तरदात्यांनी दूधबिलाच्या रक्कमेतून कुटूंबातील खर्च कपडे लत्ते , तसेच मुलांचे शिक्षण अशा प्रकारच्या गरजा थोडया बहूत प्रमाणात भागतात असे सांगितले.

३.२.८ उत्तर दात्यांच्या नांवे बॅकेत अथवा पंतसंस्थेत दूध उत्पन्नातील काही रक्कम गुतवण्यासंदर्भात (Saved money in Bank / Society on your own)

तुमच्या स्वतःच्या नांवे बॅकेत /पंतसंस्थेत दूध बिलातून मिळणा-या रक्कमेपैकी काही रक्कम जमा आहे काय ?

असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला तेव्हा ४३ महिला उत्तरदात्यांनी नाही असे सांगितले व केवळ दोन महिला उत्तरदात्यांच्या नांवे दूधबिलापैकी १० हजार रूपयापर्यंत रक्कम गंतविली असल्याचे सांगितले. 4 NA

यावरून असे म्हणता येते की या व्यवसायात जरी जादा शारीरिक श्रम महिलांचे खर्च होत असले तरी स्त्री च्या नांवे संपत्ती असावी याला आज ही ग्रामीण समाजात तितकीशी मान्यता नाही. दूसरे असे की कौटूंबिक आर्थिक ओढाताणीमुळे शेतकरी व्यक्तीकडे गुतवणूक करण्याइतपत पैसे शिल्लक रहात नाहीत त्यामुळे बॅकेत अथवा पतसंस्थेत स्त्रीच्या नांवे रक्कम जमा करण्याचा प्रश्नच फारसा उपलब्ध होत नाही.

३.२.९ दूध संस्थेच्या निवडणूकीचेवेळी मतदानाचा निर्णय सभासद महिला स्वतः घेतात काय ? (Do Women Members decide whome to vote in the election?)

दूध संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत कोणाला मतदान करावयाचे याबदद्लचा निर्णय महिला सभासद स्वतःच घेतात की त्या आपल्या कुटूंबातील इतरसभासदांच्या सल्ल्यानूसार मतदान करतात हे समजून घेण्यासाठी माहिती संकलित केली सदर माहितीचे खालील सारणीत वर्गीकृत केली आहे.

सारणी कमांक ३.२.९

उत्तरदात्यांचे मतदानाबदद्लचा निर्णय कोण घेते याचे वर्गीकरण खालील सारणीत दिले आहे

अ.नं.	मतदानाचा निर्णय कोण घेते ?	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	स्वतः ठरविते	१७	३७.७८%
२	कुटूंबातील सदस्यांच्या मनाप्रमाणे	२८	६२.२२%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.२.९ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य महिला उत्तरदात्या (६२.२२ %) दूध संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत आपल्या कुटूंबातील सदस्यांच्या मताप्रमाणे मतदान करतात तर उर्वरित १७ (३७.७८%) महिला उत्तरदात्या स्वतः व्यक्तिगत मताप्रामाणे संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान करतात.

प्रत्यक्ष निरिक्षणावरून असे दिसून आले की आजही बहुसंख्य ग्रामीण स्त्रीया कुटूंबातील पुरूष सदस्यांच्या मताप्रमाणेच वागत असतात पारपारिक रितीरिवाजानूसार पुरूष श्रेष्ठत्व कल्पना त्यांच्यामनात ठोस रूजलेली आहे त्यामुळे पुरूष प्रधान संस्कृती

मूल्ये डावलून पुढे येणे बहुसंख्य ग्रामीण स्त्रियांना अजूनही शक्य झालेले नाही केंद्र कुटूंबाची पार्श्वभूमी लाभलेल्या काही स्त्रीया आज स्वतंत्रपणे स्वतःची मते निवडणूकीच्यावेळी मांडतात असे दिसून आले. केंद्र कुटूंब पध्दतीमूळे व सहकारी दूध संस्थेतील सभागामुळे निर्णय निर्धारण प्रकियेत ग्रामीण स्त्रिया काही प्रमाणात सहभागी होताना दिसून येत आहे. त्यामुळे स्त्रियांच्या मानसिक सबलीकरणास चालना मिळत असल्याचे सूचित होते.

३.२.१० उत्तरदात्यांचा दूध संस्थेच्या समेतील सहभाग (Participation of respondents' **in the meeting of M.P.. C.S.)**

सारणी कमांक ३.२.१० मध्ये उत्तरदात्यांच्या दूध संस्थेच्या समेत सहभागी होण्याविषयीच्या महितीचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

सारणी कमांक ३.२.१०

उत्तरदात्यांचे दूध संस्थेच्या समेतील सहभाग

अ.नं.	समेतील सहभाग	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	सहभाग असतो	४२	९३.४४%
२	सहभाग नसतो	०३	०६.६६%
	एकूण	४५	१००%

सारणी कमांक ३.२.१० मधील माहितीवरून असे दिसून येते की बहूसंख्य ४३(९३.३४%) महिला उत्तरदात्या संस्थेच्या समेस हजर असतात. केवळ तीन महिला उत्तरदात्यांनी आपण संस्थेच्या समेत हजर रहात नाही. असे सांगितले. या ३ स्त्रीया

वयस्कर होत्या शिवाय अशिक्षितपणा व घरातील कामाच्या जबाबदारीमुळे सभेमध्ये जाऊन वेळ का खर्च करा असा समज त्यांच्या बोलण्यातून दिसून आला.

ज्या ४३ महिला उत्तरदात्यांनी सभेला हरज रहातो असे सांगितले त्यांनी सभेत संस्थेबदद्लची माहिती मिळते ,इतराचे विचार ऐकायला मिळतात असेही सांगितले

३.२.११ दूध संस्थेच्या सभेत महिला स्वतःची मते मांडतात काय ? (Do Women Members express their opinion in M. P. .C.s. meeting)

सारणी क्रमांक ३.२.११ मध्ये उत्तरदात्यां महिलांच्या दूध संस्थेच्या सभेत स्वतःची मते मांडतात का या विषयीच्या माहितीचे वर्गीकरण दिले आहे.

सारणी क्रमांक ३.२.११

महिला सभासद सहकारी दूध संस्थेच्या सभेमध्ये स्वतःची मते मांडतात का ?

अ.नं.	उत्तर दात्यांच्या प्रतिक्रिया	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	हाये	३५	७७.७८%
२	नाही	१०	२२.२२%
	एकूण	४५	१००%

सारणी क्रमांक ३.२.११ मधील माहितीवरून हे स्पष्ट होते की बहूसंख्य महिला उत्तरदात्या ३५ (७७.७८%) हया दूध संस्थेच्या सभेमध्ये स्वतःची मते मांडतात. तर उर्वरित १० (२२.२२%) महिला उत्तरदात्या सहकारी दूध संस्थेच्या सभेत स्वतःची मते मांडत नाहीत.

मुलाखत अनुसूचिच्या आधारे मिळालेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले की बहूसंख्य महिला उत्तरदात्या सहकारी दूधसंस्थेच्या सभेमध्ये स्वतःची मते मांडतात.

यावरून असे म्हणता येईल की दूध संस्थेच्या महिला सभासद निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होताना दिसून येत आहे.

ज्या स्त्रिया सभेत मते मांडत नाहीत असे म्हणाल्या त्या अशिक्षित आणि एकत्र कुटूंबाची पार्श्वभूमी लाभलेल्या होत्या असे त्यांच्या मुलाखतीच्या वेळी दिसून आले होते.

३.२.१२ महिला सभासदांचा सहकारी दूध संस्थेतील सहभाग

दूध संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी इतर घरगुती कामातून वेळ उपलब्ध करून दिला जातो काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला तेव्हा सर्वच उत्तरदात्यांनी संस्थेच्या सभा, किंवा इतर कामकाजात सहभागी होण्यासाठी वेळ उपलब्ध होतो असे सांगितले. पारंपरिक दृष्टीकोन बाजुला सारून आज बहुसंख्य स्त्रियांचा सहकारी क्षेत्रातला सहभाग वाढत आहे यावरून असे म्हणता येईल की सहकारी क्षेत्र ग्रामीण महिलांना सभा संमेलनातून एकत्र येऊन एकमेंकांशी प्रभावी आंतरक्रिया करून स्त्रियांच्या सामाजिक सबलीकरणास प्रोत्साहन देत आहे असे सूचित होते

विभाग ३ रा

३.३ सहकारी दूध संस्थाचा सभासद महिलावंरील प्रभाव व काही निरीक्षणे (Impact of Dairy Co-operatives on respondents some observation)

३.३.१ दूध संस्थेतील सहभाग आणि सभासद महिलांचा कुटूंबातील दर्जा (Participation in M. P. C.S. and respondents status in their own family)

दूध संस्थेच्या सभासद महिला उत्तरदात्यांना कमावती स्त्री म्हणून तुम्हाला तुमच्या कुटूंबात मान मिळतो काय ? असा प्रश्न विचारला तेंव्हा नमुन्यातील सर्वच महिला उत्तरदात्यांनी स्वतःला आपल्या कुटूंबात मान मिळतो असे सांगितले. या स्त्रिया कष्ट करून दुग्ध व्यवसायातून स्वतःच्या कुटूंबाच्या चरितार्थासाठी काही पैसे मिळवून देतात. त्यामूळे कमावती स्त्री म्हणून त्यांना कुटूंबात मान मिळतो. असे सांगीतले त्यामुळे त्यांचा

आत्मविश्वास वाढण्यास मदत होते यावरून सहकारी दूध संस्था ग्रामीण महिलांच्या मानसीक सबलीकरणास चालना देत आहे असे दिसून येते.

३.३.२ दूध सस्थेतील सहभाग आणि कुटूंबाचा समाजातील दर्जा (Participation in M.P.S.C.s. and Family Status in Society)

दूध संस्थेतील सहभागामूळे तुमच्या कुटूबांचा दर्जा वाढला आहे असे आपणास वाटते काय? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता सर्वच महिला उत्तरदात्यांनी दूधसंस्थेतील सहभागामूळे विशेषतः आर्थिक प्राप्ती वाढल्यामुळे, समाजातील त्यांच्या कुटूंबाच्या दर्जात वाढ झाली आहे. असे सांगितले. यावरून असे सूचित होते की, सहकारी दूध संस्थामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे.

३.३.३ दूध संस्थेतील सहभाग आणि आत्मविश्वास वाढल्याचा अनुभव (Participation in M.P.C.S. and confidence to mix in society)

दूध संस्थेतील सहभागामूळे समाजात मिळून मिसळून काम करण्याचा आत्मविश्वास आपल्यात निर्माण झाला आहे असे आपल्याला वाटते काय ? असा प्रश्न सभासद महिला उत्तरदात्यांना विचारला तेंव्हा सर्वच महिला उत्तरदात्यांनी सहकारी दूध संस्थेतील सहभागामूळे इतर सामाजिक कार्यक्रमात व सार्वजनिक सभा समारंभात आपण सर्वाशी मिळून मिसळून काम करू शकतो असा आत्मविश्वास आपल्यात निर्माण झाला आहे. असे सांगितले. यावरून असे म्हणता येईल की, सहकारी दूधसंस्था ग्रामीण स्त्रियांच्या व्यक्तीमत्व विकासाला पोषक आहेत. महत्वाची बाब म्हणजे सहकारी दूध संस्था समाज जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढण्यासाठी अनूकूल वातावरण निर्माण करणा-या संस्था आहेत.

३.३.४ दूधसंस्था स्वतः चालविण्याचा आत्मविश्वास ' (confidence to run/conduct M.P.C.s. on their own)

सारणी कमांक मध्ये एखादी दूध संस्था आपण स्वतः चालविण्याचा आत्मविश्वास वाढला आहे काय ? या प्रश्नावरून उत्तरदात्यांचे वर्गीकरण दिले आहे.

सारणी कमाकं ३.३.१

दूध संस्था आपण स्वतः चालविण्याचा आत्मविश्वास वाढला आहे काय ?

अ.नं.	उत्तर दात्यांच्या प्रक्रिया	वारंवारिता	टक्केवारी (%)
१	होय	१५	३३.३४
२	नाही	३०	६६.६६
३	एकूण	४५	१००

What it indicate

सारणी कमांक ३.३.४ मधील माहितीवरून असे दिसून येते की बहुसंख्य ३० (६६.६६%) महिला उत्तरदात्यांमध्ये स्वतः सहकारी संस्था चालवू शकू असा आत्मविश्वास नाही तर निवडलेल्या नमुन्यातील केवळ १५ (३३.३४%) महिला उत्तरदात्यांना स्वतः एखादी सहकारी संस्था चालवू शकू असा आत्मविश्वास वाटतो.

ज्या १५ महिलांनी संस्था स्वतः चालवू असा आत्मविश्वास वाटतो असे सांगितले त्या जवळ जवळ सर्वच महिला संचालक मंडळातील सदस्या आहेत. आणि त्या १५ महिलांपैकी १४ महिला या मराठा जातीतील दिसून आल्या तर १ परिट जातीतील होती. जवळ जवळ या सर्वच महिला प्राथमिक , माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत

त्यातील दोन महिला उच्च माध्यमिक व पदवी पर्यत शिक्षण घेतलेल्या दिसून आल्या केवळ पाच महिला वगळता इतरांना कौटूंबिक विभक्त कुटूंबाची पार्श्वभूमी असल्याचे दिसून आले. या सर्व महिला सरासरी २०००० ते ५०००० रू पर्यंतच्या कौटूंबिक वार्षिक उत्पन्न गटातील असल्याचे दिसून आले.

यावरून असे म्हणता येईल की, एखादी संस्था चालविण्याचा आत्मविश्वास आहे असे म्हणणा-या महिलाउत्तरदात्या अपवाद वगळता सुशिक्षित मध्यम २५ ते ३५ वयोगटातील तसेच मध्यम वर्गीय कौटूंबिक गटातील आहेत.विशेष बाब म्हणजे या स्त्रियांच्या कुटूंबातील पुरूषव्यक्ती सहकारी व राजकीय क्षेत्रात सतत कार्य करत असलेमूळे सहाजिकच या

स्त्रियांनाही सहकारी संस्थाचे सभासदत्व मिळालेले प्रत्यक्ष निरिक्षणावरून संशोधिकेला दिसून आले. या वरून असे सूचित होते की, निवडलेल्या दोन दूध संस्थातील , सुमारे १/३ महिंलांमध्ये नेतृत्वगुण असल्याची जाणीव व आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून येते. ही बाब त्यांचे सामाजिक आणि राजयकीय सबलीकरण घडून येत असल्याचे द्योतक मानता येईल.

३.३.५ दूध संस्थेतील महिला सभासदांनी स्थानिक पातळीवरच्या ग्रामपंचायतीच्या निवडणूका लढविल्या आहेत काय ?

या संबधीची माहिती मिळविली असता असे दिसून आले की, या सर्व महिला उत्तरदात्यांबाबत त्यांच्या मुलाखती मधून उत्तरदात्या महिलांपैकी ८ महिला सभासदांनी ग्रामपंचायत निवडणूक लढविली आहे. या सर्व ८ महिला सध्या महिला दूध सहकारी संस्थेच्या संचालक पदावर काम करत आहेत या महिला मराठा जातीतील असून त्यांची शैक्षणिक , आर्थिक स्थिती उत्तम असल्याचे दिसून आले तसेच या महिलांच्या कुटूंबातील

पूरूष व्यक्ती राजकीय व सहकारी क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे ही या महिलांना राजकीयक्षेत्रात काम करण्याची संधी मिळालेली आहे.

या वरून असे म्हणता येईल की ग्रामीण भागात सहकारी दूध संस्थामूळे महिलानां राजकीय क्षेत्रातकाम करण्यास प्रोत्साहन मिळत आहे. त्यामुळे महिला सहकारी दूध संस्था राजकाराणातील महिलांचा प्रवेश वाढविण्यास आणि त्यांच्या राजकीय सबलीकरणास निश्चितच मदत करत आहेत असे संशोधिकेला दिसून आले.

३.३.६ संधी मिळाल्यास ग्रामपचांयत, पंचायत समिती , जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्याची आपली इच्छा आहे काय ?

संधी मिळाल्यास ग्रामपचांयत, पंचायत समिती , जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्याची आपली इच्छा आहे काय ? असा प्रश्न उत्तरदात्यांना विचारला होता. उत्तर दात्यामहिलांकडून मिळालेल्या माहितीवरून असे दिसून आले की संधी मिळाल्यास स्थानिक पातळीवरच्या ग्रामपचांयत, पंचायत समिती , जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्याची इच्छा असल्याचे बहुसंख्य २५ (५५.५६%) उत्तरदात्यांनी महिलांनी व्यक्त केली तर त्यानंतर २० (४४.४४%) महिला उत्तर दात्यांनी अशा प्रकारच्या निवडणूका लढविण्याची इच्छा नाही असे सांगितले या वरून असे सूचित होते की, सहकारी संस्थातल्या सहभागामूळे प्रोत्साहित होऊन तसेच महिला आरक्षणामुळे मिळाणा-या लाभामुळे अनेक स्त्रिया राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यास इच्छूक आहेत सहकारी दूध संस्थातील सहभागामूळे ग्रामीण स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणास चालना मिळत आहे असे म्हणता येईल.

३.३.७ दूध संस्थामध्ये महिलांचा सहभाग आणखी वाढवा म्हणून आपण कोणत्या उपाययोजना सुचवाल ?

दूध संस्थामध्ये महिलांचा सहभाग आणखी वाढवा म्हणून आपण कोणत्या उपाययोजना सुचवाल ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता नमून्यातील जवळ जवळ सर्वच महिलांनी खालील प्रमाणे मुदद् उपस्थित केले.

१) संस्थेने गरजू व गरीब महिलांना दूभती जनावरे घेण्यासाठी आणखी कर्जपुरवठा करावा.

२) महिलांमध्ये सहकाराची भावना जागृत होण्यासाठी मार्गदर्शपर चर्चा सत्र, महिला बचतगटाची माहिती, महत्व व त्याचे आर्थिक फायदे याबदद्ल संस्थने वेळोवेळी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

३) शिवाय अधिक दुग्धोत्पादन कसे वाढविता येईल यासाठी कार्यशाला, पशुप्रदर्शन मेळावे भरवून माहिती मिळवून द्यायला हवी.

४) तसेच महिलांना जास्त संख्येने उपस्ति राहण्यासाठी प्रात्साहन मिळावे.

३.३.८ स्त्रियांच्या सहकारी दूध संस्थामधील पुरूषांचा सहभाग (**Male participation in women's dairy co-operatives**)

आपली सहकारी महिला दूध संस्था स्थापन करण्यासाठी कोणी पुढाकार घेतला ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता सर्वच महिला उत्तर दात्यांनी पुरूषांनी पुढाकार घेतला असे सांगितले. महिला दूध संस्था महिलांच्या सबलीकरणासाठीचा स्थुत्य कार्यक्रम आहे असे असले तरी अशा महिला दूध संस्था स्थापन करण्या मागची पार्श्वभूमी थोडी वेगळीच आहे. गावात आधीच एक किंवा एका पेक्षा अधिक जनरल सहकारी दूध संस्था स्थापन होऊन कार्यरत असतात त्यामूळे अधिकच्या नव्या दूध संस्थेला शासनाची प्राधान्याने मान्यता मिळत नाही. पण केवळ महिलांच्या नव्या दूध संस्थेला शासनाची

प्राधान्याने मान्यता मिळते. गावातील राजकीय गटबाजीमुळे आपल्याच गटाचे वर्चस्व गावामध्ये राखण्यासाठी अशा महिला दूध संस्था स्थापन केल्या जातात असे चित्र आहे प्रत्यक्ष निरिक्षणावरून व महिला उत्तरदात्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे वरील निष्कर्षास आधार मिळतो.

३.३.९ आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात पुरूष व्यक्तींचा सहभाग कितपत आहे?

(Mens participation in M.P.C.S. at present)

आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात पुरूष व्यक्तींचा सहभाग कितपत आहे? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता. पुरूषांचा सहभाग दूधसंस्थेच्या कामकाजात मोठया प्रमाणावर असल्याचे सर्वच महिला उत्तरदात्यांनी सांगितले.

लिंग भेदावर आधारित श्रम विभाजनामुळे घरकाम व इतर बरीचशी कामे (स्वयंपाक, बालसंगोपन, स्वच्छता) इत्यादी स्त्रियांनाच करावी लागत असतात. नेमक्या दूध संकलनाच्या वेळा आणि घरातील या कामाच्या वेळा एकच असल्याने स्त्रियांना घराबाहेर पडून अशा संस्थातून काम करण्यास पूरेसा वेळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे व पारंपारिक अभिवृत्तीमुळेही सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांपेक्षा पुरूषांचा सहभाग मोठया प्रमाणावर असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे महिला सहकारी दूधसंस्थेत पुरूष व्यक्तींचा सहभाग मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते

३.३.१० आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात आपल्या कुटूंबातील पुरूष व्यक्तींची मदत आवश्यक आहे. असे आपल्याला वाटते काय ? (Co-operation of male members is necessary for running M.P.C.S.)

आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात आपल्या कुटूंबातील पुरूष व्यक्तींची मदत आवश्यक आहे. असे आपल्याला वाटते काय ? या प्रश्नाला सर्व महिला उत्तरदात्यांनी "मदत आवश्यक आहे" असे स्पष्ट पणे सांगितले. या गोष्टीचे समर्थन करताना त्या

म्हणाल्या की आम्हांला आमची घरची कामे संपत नसल्या कारणाने चूल व मूल या पारंपारिक समाज रिती बंधनात अडकून पडलेल्या आम्हां स्त्रियांना सहकारी क्षेत्रात घराबाहेर पडून पूर्ण वेळ व स्वतःच्या जबाबदारीवर सर्व निभावता येत नसल्याकारणाने पुरूष व्यक्तींच्या मदतीशिवाय असे व्यवहार पूर्ण होऊ शकणार नाहीत. त्यामुळे सदर महिला संस्था जरी महिलांसाठी स्थापन केल्या असल्या तरी संस्थेचे व्यवहार मात्र पुरूष व्यक्तीच मोठया प्रमाणावर पहात आहेत असेच प्रत्यक्ष निरिक्षणावरून व अनौपचारिक चर्चेवरून दिसून आले. असे असले तरी सहकारी दूध संस्थामुळे महिलांना होत असलेले फायदे कमी महत्वाचे ठरत नाहीत.

एकंदरित वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की सहकारी दूध संस्थेतील सहभागामूळे ग्रामीण महिलांना आर्थिक लाभ तर होत आहेच याशिवाय त्यांच्या माणसिक, सामाजिक, राजकीय सबलीकरणास चालना मिळत आहे.

प्रस्तुत अभ्यासाबाबत सारांश रूपाने असे म्हणता येईल की सहकारी दूध संस्थामूळे

१) ग्रामीण महिलांना उत्पादक आर्थिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

२) कुटूंबाबाहेरील औपचारिक संघटनेचे (दूध संस्था) सभासद होण्याची संधी मिळाली आहे.

३) अर्थाजनाची संधी उपलब्ध झाली आहे.

४) मर्यादित प्रमाणात का होईना पण स्वतः पैसे खर्च करण्याची स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे.

५) सभेसारख्या औपचारिक प्रक्रियेत सहभागी होण्याची व तेथे आपली मते व्यक्त करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

६) काही स्त्रियांना नेतृत्व पदे मिळाली आहे.

७) काही स्त्रियांना ग्रामपचायतीसारख्या निवडणूकीत उभे रहण्याची संधी मिळाली आहे.

८) स्त्रियांमध्ये स्वतःच्या कुटूंबातील स्वतःचा दर्जा तसेच त्यांच्या कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढल्याची जाणीव झाली आहे.

९) काही स्त्रियांमध्ये स्वतः च दूध संस्था चालविण्याचा आत्मविश्वास निर्माण होत आहे.

१०) स्त्रियांमध्ये कुटूंबाबाहेरिल समाजजीवनात सहभागी होण्याबाबतचा आत्मविश्वास निर्माण होत आहे.

या वरून महिलांच्या सहकारी दूध संस्था ग्रामीण स्त्रियांच्या मानसीक सामाजिक आर्थिक आणि राजकीय सबलीकरणास चालना देणा-या संस्था आहेत असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येईल.